RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १३९(२)] शुक्रवार, सप्टेंबर २६, २०२५/आश्विन ४, शके १९४७ [पृष्ठे ४ , किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१.**

क्रमांक झोपुप्रा-२०२५/प्र.क्र.११३/झोपसू.- महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा.२८) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१), कलम ३Y च्या उप-कलम (१) आणि कलम ३५ च्या पोट-कलम (१) तसेच या संदर्भात शासनास प्राप्त असलेल्या इतर सर्व अधिकारांचा उपयोग करून आणि पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्या नियुक्ती संदर्भातील गृहनिर्माण विभाग, शासन अधिसूचना क्र. झोपुप्रा-२०२३/प्र.क्र.६६/झोपसु, दिनांक १५ सप्टेंबर २०२३ अधिक्रमित करून शासन याद्वारे,-

(अ) यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यांची, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये, त्या प्रत्येकाच्या नावासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

(ब) यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमातील कलम ३Y च्या प्रयोजनासाठी अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येकाच्या नावासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांकरिता प्राधिकृत अधिकारी म्हणून प्राधिकृत करीत आहे.

(क) यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यांची, उक्त अधिनियमाच्या कलम ३५ च्या पोट-कलम (१) च्या प्रयोजनांसाठी, अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये, त्या प्रत्येकाच्या नावासमोर अनुक्रमे नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेल्या अथवा दिलेल्या कोणत्याही नोटिशीने, आदेशाने वा निदेशाने बाधित झालेल्या व्यक्तीस ज्याच्याकडे अपील करता येईल असा अपीलीय प्राधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे;

## अनुसूची

**अ. पुणे महानगरपालिका क्षेत्र :-**

| अ. क्र. १ | सक्षम प्राधिकारी २ | क्षेत्र ३ | अपीलीय प्राधिकारी ४ |
|---|---|---|---|
| १. | सक्षम प्राधिकारी क्र.१ (महाराष्ट्र शासनातील अवर सचिव या पदापेक्षा कनिष्ठ नसलेला किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी). | पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी वगळता पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही प्रकारची मुदत व मालकी असलेल्या सर्व जमिनी (गृहनिर्माण योजनांसाठी स्वेच्छेने देऊ केलेल्या केंद्रसरकारच्या जमिनींसह). | सचिव तथा अपर जिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी |
| २. | सक्षम प्राधिकारी क्र.२ (आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी नियुक्त केलेले उपायुक्त, पुणे महानगरपालिका). | पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी. | सचिव तथा अपर जिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी. |

**ब. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र :-**

| अ. क्र. १ | सक्षम प्राधिकारी २ | क्षेत्र ३ | अपीलीय प्राधिकारी ४ |
|---|---|---|---|
| १. | सक्षम प्राधिकारी क्र.३ (महाराष्ट्र शासनातील अवर सचिव या पदापेक्षा कनिष्ठ नसलेला किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी). | पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी वगळता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही प्रकारची मुदत व मालकी असलेल्या सर्व जमिनी (गृहनिर्माण योजनांसाठी स्वेच्छेने देऊ केलेल्या केंद्रसरकारच्या जमिनींसह). | सचिव तथा अपर जिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी. |
| २. | सक्षम प्राधिकारी क्र.४ (आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी नियुक्त केलेले उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) | पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी. | सचिव तथा अपर जिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रशेखर तरंगे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 26th September, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

No. Zopupra-2025/C.R.113/Zopasu.- In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3, sub – section (1) of section 3Y and sub-section (*1*) of section 35 of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah. XXVIII of 1971), and of all other powers enabling in this behalf and in supersession of the Government Notification, Housing Department, No. Zopupra-2023/C.R.66/Zopasu, dated the 15th September, 2023 issued in this behalf with respect to appointment of Competent Authority and Appellate Authority for the areas of Pune Municipal Corporation and Pimpri-Chinchwad Municipal Corporation, the Government of Maharashtra hereby,-

(*a*) appoints the officers mention in column (*2*) of the Schedule appended hereto, to be the Competent Authority for the purpose of the said Act, for the areas specified, respectively, against each of them in column (*3*) thereof;

(*b*) authorises the officers mentioned in column (*2*) of the Schedule appended hereto, for the purposes of section 3Y of the said Act, for the areas specified respectively, against each of them in column (*3*) thereof; and

(*c*) appoints the officers mentioned in column (*4*) of the said Schedule, to be the Appellate Authority for the purposes of sub-section (*1*) of section 35 of the said Act, to whom any person aggrieved by any notice, order or direction issued or given by the Competent Authority, mentioned respectively against each of them in column (*2*) thereof, may appeal to.

*Schedule*

**A. Pune Municipal Corporation Area.-**

| Sr. No. (1) | Competent Authority (2) | Area (3) | Appellate Authority (4) |
|---|---|---|---|
| 1. | Competent Authority No.1 (Not below the rank of Under Secretary to the Government of Maharashtra or equivalent thereto) | All lands having any type of tenure and ownership in Pune Municipal Corporation areas (including Central Government lands unless voluntarily offered for housing scheme), except the lands belonging to Pune Municipal Corporation. | Secretary and Additional Collector, Slum Rehabilitation Authority, Pune and Pimpri-Chinchwad or equivalent. |
| 2. | Competent Authority No.2 (Deputy Commissioner, Pune Municipal Corporation as designated by the Commissioner, Pune Municipal Corporation) | Lands belonging to Pune Municipal Corporation in Pune Municipal Corporation Areas. | Secretary and Additional Collector, Slum Rehabilitation Authority, Pune and Pimpri-Chinchwad or equivalent. |

**B. Pimpri-Chinchwad Municipal Corporation Area :-**

| Sr. No. (1) | Competent Authority (2) | Area (3) | Appellate Authority (4) |
|---|---|---|---|
| 1. | Competent Authority No.3 (Not below the rank of Under Secretary to the Government of Maharashtra or equivalent thereto) | All lands having any type of tenure and ownership in Pimpri-Chinchwad Municipal Corporation areas (including Central Government lands unless voluntarily offered for housing scheme), except the lands belonging to Pimpri-Chinchwad Municipal Corporation. | Secretary and Additional Collector, Slum Rehabilitation Authority, Pune and Pimpri Chinchwad or equivalent. |
| 2. | Competent Authority No.4 (Deputy Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation as designated by the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation) | Lands belonging to Pimpri-Chinchwad Municipal Corporation in Pimpri-Chinchwad Municipal Corporation Areas. | Secretary and Additional Collector, Slum Rehabilitation Authority, Pune and Pimpri Chinchwad or equivalent. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRASHEKHAR TARANGE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.